**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

**A- Grade (CGPA 3.08)**

---

वित व लेखा/२०२६-२७/ १४१ 　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : २२.०६.२०२६

प्रति,

श्री शरद कोकाटे,

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,

कक्ष क्रमांक ४२२, ४था मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई - ४०० ०३२.

**विषय :- वार्षिक लेखे अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपल्या पत्र क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०१/ई-१५२३७९६/विशि- दिनांक ०८ जून २०२६ अन्वये प्राप्त झालेल्या पत्राचा संदर्भ घेण्यात येत आहे. सदर पत्र या कार्यालयास दिनांक ०९ जून २०२६ रोजी प्राप्त झाले.

सन २०२१-२२ चे लेखे वित व लेखा समितीच्या दिनांक १७.१२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत, तसेच व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०३.०१.२०२५ व अधिसभेच्या दिनांक २४.०३.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत मजूर करण्यात आले असून लेखापरीक्षित वितीय विवरणपत्रास मान्यता प्राप्त झाली आहे. सदर लेखे शासनास सादर करण्यात आलेले आहेत

त्यानंतर सन २०२२-२३ चे लेखे पूर्ण करून त्यांचे लेखापरीक्षण कार्य हाती घेण्यात आले. सन २०२२-२३ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालाच्या सादरीकरणास झालेल्या विलंबाची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :

### १. प्रलंबित वार्षिक लेखे व लेखापरीक्षणाचा अनुशेष (Backlog) :

विद्यापीठामध्ये मागील अनेक वर्षांचे वार्षिक लेखे तसेच लेखापरीक्षण अनुपालनाचा (Audit Compliance) मोठ्या प्रमाणात अनुशेष प्रलंबित होता. त्यामुळे सन २०२२-२३ चे लेखे अंतिम करण्यापूर्वी मागील वर्षांचे लेखे पूर्ण करणे, त्यांचे ताळमेळ (Reconciliation) करणे, लेखापरीक्षणातील त्रुटींचे निवारण करणे व आवश्यक वैधानिक मान्यता प्राप्त करणे या बाबींना प्राधान्य देणे आवश्यक होते.

### २. तांत्रिक लेखा मनुष्यबळाची कमतरता :

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचे कार्य पाच परिसरात, संचलित महाविद्यालये, विविध विभाग, वसतिगृहे, संशोधन केंद्रे व अनुदानित प्रकल्पांमार्फत चालते. तथापि, विविध विभागांमध्ये आवश्यक त्या प्रमाणात तांत्रिक व अनुभवी लेखा कर्मचारी उपलब्ध नव्हते. उपलब्ध कर्मचारीवर्गामध्येही अस्थायी कर्मचाऱ्यांचे प्रमाण अधिक होते. परिणामी, मर्यादित मनुष्यबळावर दैनंदिन आर्थिक कामकाज, वैधानिक अनुपालन (Statutory Compliance), अर्थसंकल्प तयार करणे तसेच लेखापरीक्षणाशी संबंधित कामे एकाच वेळी हाताळावी लागल्याने या प्रक्रियेस विलंब झाला

सन २०२२-२३ च्या लेखापरीक्षित लेख्यांच्या सादरीकरणातील विलंब हा प्रामुख्याने मागील वर्षाचा संचित अनुशेष, विविध विभागांच्या खात्यांचे एकत्रीकरण व ताळमेळ, अनुदानाची पडताळणी, मनुष्यबळाची कमतरता आणि वैधानिक मंजुरी प्रक्रिया पूर्ण करणे यांमुळे झाला आहे. हा विलंब पूर्णपणे प्रशासकीय व कार्यपद्धतीचा भाग होता.

तसेच, सन २०२२-२३ चे लेखे वित्त व लेखा समितीच्या दिनाक १९.११.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर करण्यात आले असून ते व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २५.११.२०२५ रोजीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आले. व्यवस्थापन परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अधिसभेच्या दिनांक २८.११.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्रास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर लेख्यांच्या मराठी व इंग्रजी प्रत्येकी एकूण दोन प्रती पत्र क्रमाक **वित्त व लेखा/२०२६-२७/१४३ दिनांक ०८.०६.२०२६** अन्वये शासनास सादर करण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यकतेनुसार आणखी २० प्रती यासोबत सादर करण्यात येत आहेत तसेच सदर दस्तऐवज 3 पेनड्राइव्हमध्ये उपलब्ध करून देत आहोत.

तरी सदर वस्तुस्थिती व माहितीचा सकारात्मक स्वीकार व्हावा, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. विलास द. [illegible]टवडेकर)

कुलसचिव